**NANDED WAGHALA CITY MUNICIPAL CORPORATION NANDED**
**(शासन निर्णय दि.27.09.2018 नुसार)**

**Tender Notice No.:- NWCMC/(PWD) E-Tender/3836/2025 Dt. 17.06.2025**

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील जानकी नगर येथील "राजमाता जिजाऊ सृष्टी" येथे राजमाता जिजाऊ यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश, संगीत आणि ध्वनी यांचा दृश्यस्वरूपातील देखावा (Light & Sound Show) सादर करणे कामासाठी या क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती/संस्था यांचेकडुन ई - दरपत्रक मागवित आहेत. या निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळा वरून खरेदी करता येईल. निविदेच्या इतर अटी व शर्ती वरील संकेतस्थळावर नमुद केलेल्या आहेत

**ई-निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | ई-निविदा प्रकाशित करणे | - | 15.00 |
| 2 | ई-निविदा डाऊनलोड करणे | **18.06.2025** | 15.00 |
| 3 | ई-निविदा भरणे | **18.06.2025** | 15.00 |
| 4 | ई-निविदा भरण्याचा अंतिम दिनांक | **25.06.2025** | 15.00 |
| 5 | ई-निविदा उघडणे | **27.06.2025** | 15.00 |

| **अ.क्र.** | **कामाचे नांव** | **को-या निविदेची किंमत** |
|---|---|---|
| **1** | नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका क्षेत्रातील जानकी नगर येथील "राजमाता जिजाऊ सृष्टी" येथे, इमारत किंवा भिंतीवर शिवकालीन प्रसंग तसेच राजमाता जिजाऊ यांच्या जीवनचरित्रावर आधारित २० मिनिटांचा प्रकाश, संगीत आणि ध्वनी यांचा दृश्यस्वरूपातील देखावा (Light & Sound Show) सादर करणे. | **1000/-** |

**अटी व शर्ती**

1) निविदा धारकाने ई-निविदा पोर्टलवर “बीड लॉक” झाल्यानंतर सादर केलेल्या निविदा दरपत्रकाची “हार्ड कॉपी” 1 प्रतीत दि.27.06.2025 रोजी दुपारी 15.00 पर्यत कार्यकारी अभियंता, साबांवि, कक्ष क्र.106 नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्या कार्यालयात सादर करावे.

2) कंत्राटदाराने निविदा दरपत्रका सोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

अ) निविदाधारकाने त्यांचा प्रमुख व्यवसाय, पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक, इत्यादी माहिती सादर करणे आवश्यक आहे.

आ) GST कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

ई) निविदा धारकाने मागील तीन वर्षाचा आयकर (Income Tax) भरणा केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

इ) निविदा धारकाने (EMD) भरणा केलेली कागदपत्रे स्कॅन/छायाकिंत प्रत दाखल करणे बंधनकारक आहे.

उ) साहित्य पुरवठा करावयाचा कालावधी तीस (30) दिवस राहील. सदर कालावधी पर्यत साहीत्य पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यास हरकत नसल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडणे बंधनकारक राहील.

ऊ) निविदाधारकाने महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) नियम 2018 नुसार प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

ए) निविदाधारकाने सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र 500/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिहुन लिफाफा क्र. 1 मध्ये जोडणे बंधनकारक आहे.

ऐ) निविदा धारकाने पुरवठा करण्यात येणा-या कंपनीचा प्रोफाईल सादर करणे आवश्यक आहे.

ओ) निविदाधारकाने कंपनीचे मान्यता प्राप्त विक्रेता असल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

3) पात्र निविदा धारकाने करारनाम्याच्या वेळी रु.25,000/- अनामत रक्कम भरणा करणे आवश्यक आहे. सदर रक्कम देखभाल दुरुस्तीचा कालावधी पुर्ण (पाच वर्षानंतर) झाल्यानंतर अदा करण्यात येईल.

4) निविदा धारकाने कोरी निविदेची किंमत (Tender Fee) व इसारा रक्कम (EMD) Online Payment Gateway व्दारे भरणा करावी.

5) कोणत्याही कारणाशिवाय एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार आयुक्तांनी राखून ठेवलेले आहेत.

6) निविदाधारकाने सोबत जोडलेली सर्व कागदपत्रे निविदेचा भाग राहील.

7) काम पुर्ण करण्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पात्र निविदाधारकास स्वतः उपलब्ध करुन घ्याव्या लागतील, याबाबत कुठलेही अतिरीक्त शुल्क/साहित्य/मनुष्यबळ इ. पुरविण्यात येणार नाही.

8) पुरवठा करावयाचे साहित्य उच्च दर्जाचे व नामांकित कंपनीचे असणे अनिवार्य असुन त्याबाबतची गॅरंटी दरपत्रकासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

9) प्रस्तावित काम हे ऐतिहासीक वास्तुवर उभारावयाचे असुन किमान एक समकक्ष काम केल्याचा शासकीय/निमशासकीय/मान्यता प्राप्त संस्थेच्या अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

10) सदर कामाची किमान 5 वर्ष देखभाल दुरुस्ती करणे अनिवार्य असुन याबाबत लेखी स्वरुपात हमी देणे बंधनकारक राहील. सदर देखभाल दुरुस्तीबाबत वेगळ्याने शुल्क अदा केले जाणार नाही. दर सादर करताना 5 वर्ष देखभाल दुरुस्तीची बाब विचारात घेवुन दर सादर करावेत.

11) पुरवठा करण्यात येणा-या उपकरणांच्या रंगाची, साहीत्याची यंत्र सामुग्रीची तसेच सर्व सुट्या भागांच्या पुढील दहा वर्षाच्या कालावधीत उपलब्धतेबाबत लेखी हमी देणे पुरवठा धारकास बंधनकारक आहे.

12) निविदा दरपत्रकात नमुद साहित्यांचे परिमाण कमी/ जास्त करण्याचा अधिकार आयुक्त, मनपा यांनी राखुन ठेवला आहे.

13) साहित्यांचे दर सादर करताना Transportation, Loading, unloading , GST व इतर आवश्यक करासह दर भरणा करावा.

14) पुरवठा करण्यात येणा-या उपकरणांची देखभाल दुरुस्ती बाबतचे वेळापत्रक व पध्दत लिखीत स्वरुपात सादर करावे.

अतिरीक्त अटी शर्ती

1. सदर उपक्रमासाठी खालीलप्रमाणे तांत्रिक बाबींचा समावेश असलेली प्रणाली आवश्यक राहील:

१. स्पष्ट, प्रभावी ध्वनी प्रणाली:

आधुनिक ऑडिओ हार्डवेअर

वातावरणसुसंगत आऊटडोअर स्पिकर्स

ऑडिओ सिग्नल नियंत्रणासाठी मिक्सर आणि ऍम्प्लिफायर

नेटवर्क आणि केबलिंग यंत्रणा

२. प्रभावी दृष्य प्रणाली:

उच्च क्षमतेचे हाय ल्युमेन्स प्रोजेक्टर (Outdoor Projection Mapping)

योग्य प्रोजेक्शन सर्फेस ट्रीटमेंट

मिडलवेअर, कंट्रोलर, नेटवर्क व केबलिंग

अनुभवी प्रोजेक्शन प्रोग्रामर द्वारा प्रणाली संयोजन

३. ऑडिओ-व्हिज्युअल सिस्टीमसाठी सॉफ्टवेअर व मिडलवेअर प्रोग्रामिंग:

सिंक्रोनायझेशन व ऑटोमेशन तंत्रज्ञान

वापरण्यास सुलभ यूजर इंटरफेस

४. चलचित्र निर्मिती (Content Creation):

कथानक व पटकथा लेखन

चित्रिकरण (Shoot), दिग्दर्शन, संकलन

VFX, ऍनिमेशन आणि साउंड डिझाइन

ध्वनी मुद्रण, व्हॉइसओव्हर, निवेदन

संगीत रचना, प्रोग्रॅमिंग आणि मिक्सिंग

५. Projection Mapping साठी:

इमारतींचे 3D स्कॅनिंग आणि डिजिटायझेशन

त्यानंतर अचूक Projection Mapping ची निर्मिती

६. कार्यक्रमाचे कार्यान्वयन, चाचणी व चालना (Commissioning, Testing and Execution):

प्रणाली बसविणे, समक्रमण करणे

Dry Run Testing, Live Synchronization Check

अंतिम सादरीकरण पूर्व चाचणी

2. वरीलप्रमाणे संपूर्ण तांत्रिक सुविधा, साहित्य, सॉफ्टवेअर, अॅनिमेशन, ध्वनी-दृष्य सादरीकरण, तसेच कार्यान्वयन व चाचणीसह परिपूर्ण कामे गुणवत्ता मानकानुसार पूर्ण करणे.

अतिरिक्त आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड (करिता)

मुळप्रतीवर मा. अति. आ. यांची सही,

प्रति,

१. संगणक विभाग, नांवाशमनपा, नांदेड

२. जनसंपर्क विभाग, नांवाशमनपा, नांदेड

**प्रपत्र - १**

**दरपत्रक**

| अ.क्र. | विवरण | परिमाण | एकक | सादर करावयाचा देकार (देकार सर्व करासहीत व प्रत्यक्ष स्थळावर बसविणे तसेच निविदेतील अटी शर्थी नुसार) |
|---|---|---|---|---|
| 1 | नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका क्षेत्रातील जानकी नगर येथील "राजमाता जिजाऊ सृष्टी" येथे, इमारत किंवा भिंतीवर शिवकालीन प्रसंग तसेच राजमाता जिजाऊ यांच्या जीवनचरित्रावर आधारित २० मिनिटांचा प्रकाश, संगीत आणि ध्वनी यांचा दृश्यस्वरूपातील देखावा (Light & Sound Show) सादर करणे. | 1 | नग | |
| | | **TOTAL** | | |

निविदा धारक
(स्टॅप व स्वाक्षरी लेटर पॅडवर )

मुळप्रतीवर मा.अतिआ.यांची ~~आहे~~ स्वाक्षरी आहे.

अतिरिक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड(जा.सं.ता.)